## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २०९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०४/२०१८

**१) ईलेक्ट्रीक मोटारीची चोरी :—**

दिनांक २२/०४/२०१८ चे रात्र. दरम्यान यातील फिर्यादी साहेबराव सखाराम बोरकर वय ६३ वर्ष, रा. पुयार याने आपली एलन कंपनीची थ्री.एच.पी ईलेक्ट्रीक मोटार किंमती ७,०००/—रु. ची आपले भावाचे घरी ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने रात्रदरम्यान घराचे मागची दाराची कडी काढुन आत प्रवेश करुन थ्री एच.पी. मोटार चोरुन नेल्याने, फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चेटुले पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) मारोती ओमनी व्हॅन गाडीची चोरी :—**

दिनांक २०/०४/२०१८ चे २०.००ते २१/०४/२०१८ चे ०७.३० वाजात. दरम्यान यातील फिर्यादी पंकजकुमार गोरेलाल राजपुत वय २५ वर्ष, रा. ग्रामपुरा बंजारा ग्रामपुरा बांरा कानारपुरा जि. आग्रा ह. मु. मुन्ना चकोले यांचे घरी किरायने छोटा बाजार मच्छी माकेट भंडारा याने आपली चारचाकी मारोती ओमनी व्हॅन क्र. सीजी ०४ एफ ४८८९ किंमती ८०,०००/—रु. ची गाडी ही मटन मार्कट छोटा बाजार येथे ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने, फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) प्राणी निदर्यतेने वागविण्याचा निदर्यतेने कृरतेने कत्तली करीता वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/०४/२०१८ चे १४.१५ वाजात. दरम्यान यातील आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन क्र. एमएच ४० एके २००४ मध्ये १० जनावरे किंमती ३०,०००/—रु. चे हालचाल करता येणार नाही अशा स्थितीत आखुड दोराने बांधुन जनावरांना यातना होतील अशा रितीने कृरतेने कत्तली करीता घेवुन जाण्याच्या उद्येशाने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. खापर्डे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ११(घ)(ड)(च)प्राणी कृरतेने वागविण्याचा कायदा १९६० सहकलम ९ महाराष्ट्र संरक्षण अधि. १९७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खाडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) बोलेरो गाडीने उभा असलेल्या ट्रकला धडक मारुन नऊ जखमी :—**

दिनांक २२/०४/२०१८ चे ०२.४० वाजात. दरम्यान यातील आरोपी बोलरो गाडीचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व लापरवाहीने चालवुन एनएच ६ रोडाचे साईडला उभा असलेला नादुरुस्त ट्रक क्र. सीजी ०४एच आय ८३३६ ला धडक मारुन बोलेरो गाडी बसलेले एकुण ७ लोक व २ मुले यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने बोलेरो गाडी क्र. सिजी ०७एम ४८८२ चा चालक तसेच रोडचे साईडला उभा असलेला ट्रक सीजी ०४ एच आय ८३३६ चा चालक याचे विरुध्द फिर्यादी ललीत कुवरलाल बिसेन वय ४४ वर्ष, रा. हनुमान नगर तकीया वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन काठीने मारुन व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/०४/२०१८ चे १९.३० वाजात. दरम्यान यातील फिर्यादी संजय दलिराम ईश्वरकर वय ३१ वर्ष, ३१ रा. सारखा व आरोपी हे नात्यात चुलत भावु लागत असुन फिर्यादीचे घराचे वॉल कंपाऊन्ड करण्याकरीता फिर्यादीने ०३ ते ०४ वर्ष, पुर्वी खड्डे खोदले होते त्या खड्डयावर बास मांडुन ठेवले होते. आरोपीने ते खड्डे मी खोदलेले आहेत, तु त्या खड्डयावर बास का मांडला असे बोलुन आरोपीने हातात असलेल्या काठीने फिर्यादीचे डाव्या डोळयाचे भुवयीवर मारले व तुला जिवेमारल्या शिवाय ठेवनार नाही अशी धमकी दिल्याने, फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ३२४,५०६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**६) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/०४/२०१८ चे ११.३० ते १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील टाटा एस वाहन हे टोल नाका कारधा येथे सार्वजनीक रोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करुन मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. भोंगाडे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. संतापे पोलीस स्टेशन कारधा करीत आहेत.

**७) गळफास इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक २२/०४/२०१८ चे ०५.३० वाजता दरम्यान यातील मृतक राजकुमार बुराडे वय ३५ वर्ष, रा. डांबेविरली याने त्याचे स्वत:चे राहते घरी दार बंद करुन पोपटी रंगाचा गमच्याने छताला लागलेला पंख्याला गळफास घेवुन मरण पावल्याने, फिर्यादी भोलानाथ महादेव बुराडे वय २६ वर्ष रा. डांबेविरली यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. भोयर पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत

**८) मातीची भिंत अंगावर पडुन महिलेचा मृत्यु व मजुर जखमी :—**

दिंनाक २२/०४/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमती देवलाबाई गंगाधर नखाते वय ६५ वर्ष, रा. मोखारा ही व तिचे कामावरील मजुर ते तिच्या बांधलेल्या घराच्या अर्धवट उभा असलेल्या मातीचे भिती जवळील पडलेला सामान गोळा करीत असता अचानक मातीची भिंत मृतकचे व तिचे कामावर मजुराच्या अंगावर पडल्याने मृतक त्यात दबुन तिला गंभिर मार लागल्याने जागीच मरण पावले व मजुंर जखमी झाल्याने त्यास उपचार कामी सामान्य रुग्नालय भंडारा येथे रेफर करण्यात आले. असे फिर्यादी नंदकिशोर गंगाधर नखाते वय ४५ वर्ष, रा. मोखारा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत

**९) गळफास लावुन इसमाचा मृत्यु :—**

दिंनाक २२/०४/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राखीख वन परिक्षेत्र क्र. ३२४ येथे मजुरीने काम करीत असता यातील मृतक विक्की उर्फ बादल गंगाधर ठाकरे वय ३० वर्ष, रा. पद्मा वार्ड पवनी यांचे प्रेताला पिवळया रंगाच्या नायलॉन दोराने गळफास लावुन मरण पावल्याचे दिसत असल्याचे गुराखी प्रमोद वंसता सती बावण रा. वाही याने सांगीतल्याने घटनास्थळी जावुन फिर्यादीने बघीतल्याने यातील मृतक हा गळफास लावुन मृत अवस्थेत असल्याचे दिसत असल्याने फिर्यादी राहुल शंकरराव फुलकाने वय ५७ वर्ष, ब्राम्हणगाव जिल्हा. यवतमाळ ह.मु. विठ्ठल गुजरी वार्ड पवनी यांचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठारे पोलीस स्टेशन पवनी करीत आहेत

१०) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–

दिनांक २२/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, मोहाडी, कारधा, करडी, वरठी, तुमसर, आंधळगाव,गोबरवाही, साकोली व लाखांदुर येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण २० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४९१ लिटर हातभंट्टी दारू + ४३१० किलो सडवा मोहा+ १०० किलो गुळ+ मोटार सायकल किंमती ३,०२२,५०/रु. व ४७ लिटर ५२० मिली लिटर देशी/विदेशी दारु किंमती ३३,७२८/–रु. तसेच जुगारातुन १,०३,३,००/रु. असा एकुण किंमती४,३९,२७८ /–रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २२/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १०९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– ०२ तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – १०० केसेस करण्यात आले आहे.

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
महिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.